पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर
नविन प्रशासकिय इमारत संकुल, प्लॉट नं. १, सेक्टर – १५
मोरेकुरण रोड, कोळगाव, नवनगर, ता. जि. पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

प्रेसनोट क्र. ७६ दिनांक १२/०९/२०२६

श्रीगणेशोत्सवासाठी पालघर पोलीस दल सज्ज.

दि.१४/०९/२०२६ ते दि.२५/०९/२०२६ रोजी दरम्यान श्रीगणेशोत्सव सण साजरा होत आहे. पालघर जिल्ह्यात श्रीगणेशोत्सव व गौरी उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा होत असतो. त्या अनुषंगाने पालघर जिल्ह्यात एकूण १०६१३ खाजगी गणेश मुर्तींची तसेच १९५१ सार्वजनिक गणेश मुर्तींची स्थापना होणार आहे. तसेच ६७७ खाजगी व १६७ सार्वजनिक गौरी पुजन होणार आहे.

श्रीगणेशोत्सव काळात पालघर जिल्ह्यात कोणताही कायदा व सुव्यस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याकरीता पालघर पोलीस दलाकडून ०१ अपर पोलीस अधीक्षक, ०८ पोलीस उप अधीक्षक, ६८ पोलीस अधिकारी, ५८४ पोलीस अंमलदार, ५०० होमगार्ड, ६० वाहतुक अंमलदार, ८ स्ट्रायकींग फोर्स, ०३ दंगल नियंत्रण पथक व ०१ राज्य राखीव पोलीस दलाची तुकडी असा पोलीस बंदोबस्त लावण्यात येणार आहे.

श्रीगणेशोत्सव व गौरी पुजन सणाचे निमित्ताने श्री. यतिश देशमुख, पोलीस अधीक्षक, पालघर यांनी पालघर जिल्हा पोलीस दलाच्या वतीने सर्व नागरीकांना शुभेच्छा दिल्या असून श्रीगणेशोत्सव व गौरी उत्सव हे सण शांतता, सुरक्षितता आणि सामाजिक एकोपा राखून साजरा करावा असा संदेश दिला आहे. तसेच डिजेचा वापर न करता पारंपारिक वाद्यांचा वापर करून ध्वनी प्रदुषण होणार नाही याची दक्षता घ्यावी असे आवाहन केले आहे.